Lokneta News - लोकनेता न्युज

महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड लोकनेता

मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंडे

सोमवार १५ जून २०२६ RNI-MAHMAR/2023/89402 Email : dnyaneshmofficial@gmail.com वर्ष : ०३ अंक : २९५ किंमत २ रुपये 7499615933




# त्या अटीवर रोहित पवारांचं अन्नत्याग आंदोलन मागे,

## गिरीश महाजन यांच्या मध्यस्थीला यश

**लोकनेता न्युज नेटवर्क**

पंढरपूरमध्ये शेतकरी कर्जमाफीच्या जीआरमध्ये सुधारणा करण्यासाठी आंदोलन सुरु केले होते. आज मंत्री गिरीश महाजन यांनी रोहित पवार यांची आंदोलनस्थळी जात भेट घेतली. यावेळी रोहित पवार यांनी शेतकऱ्यांच्या मागण्याचे निवेदन दिले. यानंतर महाजन यांनी रोहित पवार यांच्यासमोर CM फडणवीस यांना फोन केला. यानंतर रोहित पवार यांनी आपलं आंदोलन स्थगित केलं आहे. आता रोहित पवार 22 जूनपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटणार आहेत. 22 तारखेच्या आधी मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेण्याच्या अटीवर उपोषण मागे घेतलं आहे.

काय म्हणाले रोहित पवार?

गिरीश महाजन यांच्या भेटीवेळी बोलताना रोहित पवार म्हणाले की, 22 तारखेला अधिवेशन आहे. त्या आधी सरकार मिटिंग घेणार आहे. 30 जूनपासून कर्जमाफी लागू होणार आहे. जे बदल आहे, ते 30 जून आधी होणार आहे. सरकारने आमच्या मागण्या मान्य कराव्यात. आपल्याकडे थोडा वेळ आहे. आपण चर्चेला मुख्यमंत्र्यांकडे गेले पाहिजे का? चर्चेला राजू शेट्टी, अजित नवले,



| शशिकांत शिंदे. हर्षवर्धन सपकाळ, | रविकांत तुपकर आणि ठाकरे गटाचे

नेतेही असतील. शेकापचे जयंत पाटील असतील. महादेव जानकर असतील. सर्व शेतकरी नेते आहेत. चर्चा करू. पुढे बोलताना रोहित पवार म्हणाले की, ‘दोनच छोट्या अटी आहेत. सरकार त्या ठेवणार नाही. पण त्यात गडबड झाली तर 4 जुलै रोजी मराठवाड्यात आंदोलन करू. बैठक ठरली आहे. मागण्यासमोर आहे. उगाच राजकारण आणून उपोषण लांबवून शेतकऱ्यांचं नुकसान करायचं नाही. रविकांत तुपकर उद्यापासून उपोषण सोडणार आहेत. त्यामुळे त्यांना भेटण्यासाठी तीन दिवस न लावता. उद्या किंवा परवाच त्यांना भेटावं.’

काय म्हणाले गिरीश महाजन?

गिरीश महाजन यांनी रोहित पवार यांच्या भेटीवेळी म्हटले की, ‘राज्य सरकार सकारात्मक आहे. मोदी असतील किंवा फडणवीस असतील सर्व सकारात्मक आहे. वारंवार शेतकऱ्यांना कर्जमाफी का द्यावी लागते. तर शेतकरी अडचणीत असतो. त्यामुळे त्यांना कर्जमाफी देत असतो. शेतकऱ्यांचा पाण्याचा प्रश्नही आपण सोडवत आहोत. रोहित पवार यांच्या मागण्यांबाबत बैठक बोलावली आहे. चर्चेतून तोडगा निघेल. मी रोहित पवार यांना विनंती करतो की त्यांनी आंदोलन मागे घ्यावं.

## पुरुषोत्तमपुरी येथिल दुर्घटना: गुरुमाऊली आयुर्वेद महाविद्यालयाकडून रुग्णावर तातडीने उपचार

अधिकमास निमित्ताने पुरुषोत्मपुरी येथे हजारो नागरिकांची दररोज गर्दी होत आहे त्यानिमित्ताने भाविक भक्तांच्या आरोग्यसेवेसाठी ‘गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेद हॉस्पिटल व महाविद्यालय, तर्फे तब्बल महिनाभर झाले आरोग्य सेवा देण्याचे व्रत सुरू आहे.

अशातच काळाचा घाव घालणारी एक दुर्घटना घडली नदीपात्रात भाविकांना पैलतीरावर घेऊन जाणारी नाव पलटल्याने नावेतील प्रवासी पाण्यात पडले व त्यांना गंभीर दुखापत झाली.

या घटनेची माहिती मिळताच गुरुमाऊली महाविद्यालयाची डॉक्टरची टीम वेळेची गंभीरता लक्षात घेऊन तत्काळ नावेत बसून पैलतीलावर पोहचली व महाविद्यालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. गिरीश कुलकर्णी आणि वैद्यकीय विद्यार्थी यांनी जखमी रुग्णांवरती तातडीने प्राथमिक उपचार केले.

## पत्नी व मुलाला भेटण्यासाठी सासरवाडीत गेलेल्या व्यक्तीसह वडिलांना १२ जणांकडून अमानुष मारहाण; धारूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**लोकनेता न्युज नेटवर्क**

धारूर /प्रदीप मुंडे

पत्नी व मुलाला भेटण्यासाठी गेलेल्या राजकुमार जगन्नाथ मुंडे व त्यांच्या वडिलांना 12 जणांनी अमानुषपणे मारहाण केल्याची घटना धारूर तालुक्यातील होळ परिसरात घडल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी धारूर पोलीस ठाण्यात 12 जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, राजकुमार मुंडे हे त्यांच्या पत्नी व मुलाला भेटण्यासाठी नातेवाईकांच्या घरी गेले होते. त्यावेळी संबंधित आरोपींनी त्यांचा पाठलाग करून वाहन अडवले. त्यानंतर राजकुमार मुंडे व त्यांच्या वडिलांना वाहनातून खाली ओढून लाथाबुक्क्यांनी, लाकडी काठ्यांनी तसेच लाथा-घुशांनी बेदम मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या मारहाणीत दोघेही जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.तसेच आरोपींनी शिवीगाळ करून जीवे





मारण्याची धमकी दिल्याचा तसेच फिर्यादीच्या वाहनाचे नुकसान केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

या प्रकरणी अनिकेत तुकाराम घुगे, तुकाराम संभाजी घुगे, अविनाश सुखदेव खाडे , नारायण धनराज घुगे, तानाजी दशरथ खाडे, दशरथ खाडे, बाळाजी ज्ञानोबा खाडे, रमेश ज्ञानोबा घुगे, स्वप्नील रमेश घुगे, सुयेश रमेश घुगे, ओम नारायण घुगे आणि सचिन बाबासाहेब राख यांच्याविरुद्ध धारूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

## इंदापुरात स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई; गावठी पिस्तूल व ७ जिवंत कारतूससह तरुण गजाआड!

**लोकनेता न्युज नेटवर्क**

इंदापूर ता. प्रति:- राहुल जाधव

शेळगाव :पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने (LCB) इंदापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत धडक कारवाई करत एका २२ वर्षीय तरुणाला गावठी पिस्तूल आणि सात जिवंत काडतुसांसह रंगेहात अटक केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक इंदापूर परिसरात गस्त घालत असताना, पोलीस अंमलदार गणेश ढेरे यांना गुप्त बातमीदारामार्फत एक महत्त्वाची माहिती मिळाली. कालठण नंबर २ येथील एक तरुण बेकायदेशीर हत्यार बाळगून फिरत असल्याची खात्रीशीर माहिती पथकाला मिळाली होती.




मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने तातडीने चक्र फिरवून सापळा रचला. संशयित आरोपी रोहन उर्फ सोन्या महेंद्र चव्हाण (वय २२, रा. कालठण नंबर २, ता. इंदापूर, जि. पुणे) याला पोलिसांनी अत्यंत शिताफीने ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्याकडे एक देशी बनावटीचे गावठी पिस्तूल (मॅगझिनसह) आणि ७ जिवंत राऊंड आढळून आले. पोलिसांनी एकूण २६,४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून आरोपीविरुद्ध इंदापूर पोलीस ठाण्यात भारतीय शस्त्र अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे. पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली ही यशस्वी कारवाई करण्यात आली. यामध्ये सहाय्यक पोलीस फौजदार शिवाजी निकम, पोलीस हवालदार किशोर तेलंग, शैलेश स्वामी, गुलाब पाटील, पोलीस अंमलदार गणेश ढेरे आणि तुषार चव्हाण या पथकाचा समावेश होता.--------

--------------------

## शेत ज़मिनीच्या वादातून धारदार शस्त्राने मारून वृद्ध इसमाचा खून

**“गंगाखेड तालुक्यातील ब्रम्हनाथवाडी शिवारातील घटना”**

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

परभणी/प्रतिनिधी :- रमेश मुलगीर

गंगाखेड: शेत जमिनीच्या वादातून धारदार शस्त्राने मारून गौडगाव येथील वृद्ध इसमाचा खून झाल्याची घटना रविवार, १४ जून रोजी दुपारी गंगाखेड तालुक्यातील ब्रम्हनाथवाडी शिवारात घडली. घटनास्थळी गौडगाव येथील ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती.

घटनेची सविस्तर माहिती:

याबाबत समजलेली अधिक माहिती अशी की, गंगाखेड तालुक्यातील गौडगाव येथील भाऊसाहेब किशनराव जाधव (वय ६३ वर्षे) यांच्या ब्रम्हनाथवाडी शिवारात असलेल्या शेत जमिनीचा वाद मागील काही वर्षांपासून शेत शेजाऱ्यांसोबत सुरू होता.

रविवार, १४ जून रोजी दुपारी भाऊसाहेब जाधव शेतात असताना, शेत शेजारी शेता जवळील खांब ओढीत नेत असल्याचे त्यांनी गावात फोन करून मुलाला व नातेवाईकांना सांगितले. तसेच “लवकर शेतात या” असे म्हटले असता त्यांचा मुलगा व नातेवाईक शेतात आले. तेव्हा भाऊसाहेब जाधव हे गंभीर जखमी अवस्थेत शेत धुण्याजवळ शेतात रक्ताच्या थारोळ्यात पडलेले दिसले.

पोलिसांची कारवाई आणि पंचनामा:

नातेवाईकांनी या घटनेची माहिती सोनपेठ पोलिसांना दिली. माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र शिरतोडे, पोलीस निरीक्षक अशोकराव गिते, पोउपनि अजय किरकन, भूषण कांबळे, पोह सुनिल गिरी, राजेश मस्के, पो.शि. भागवत हुंडेकर, पो.शि. हनुमंत पौळ, चालक गणेश नाटकर, शेख कलिंदर आदींनी घटनास्थळी धाव घेत घटनास्थळाचा पंचनामा केला.



दुपारी अंदाजे १२:३० वाजेच्या सुमारास खुनाची घटना घडल्यानंतर दुपारी २:४५ वाजेच्या सुमारास पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास उत्तरीय तपासणीसाठी (Post-mortem) मृतदेह गंगाखेड उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आला. याप्रकरणी सोनपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू होती.

डोक्यात पाठीमागून खोलवर वार:

शेत जमिनीच्या वादातून झालेल्या खुनाच्या घटनेत भाऊसाहेब जाधव यांच्या डोक्यात पाठीमागून धारदार शस्त्राने खोलवर वार करून, तसेच डोळ्याजवळ मारून गंभीर जखमी केल्याचे दिसले.

या घटनेतील आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी करत नातेवाईकांनी संताप व्यक्त केला असता, आरोपींच्या शोधार्थ पोलिसांचे वेगवेगळे पथक रवाना करण्यात आल्याची माहिती उपविभागीय अधिकारी राजेंद्र शिरतोडे यांनी नातेवाईकांना दिली.

## *तुकाराम मुंढेचे झंझावाताचे लोण आता शिर्डीत राज्यभरात भेसळ खोरांविरोधात धडक कारवाया सुरू

**लोकनेते न्यूज नेटवर्क**

अहिल्यानगर प्रतिनिधी | बापुसाहेब घोडेस्वार

अहिल्यानगर : अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी राज्यभरात भेसळखोरांविरोधात धडक कारवाया सुरू केली असल्याने या झंझावाताचे लोण आता शिर्डीत पोहचले आहे. एव्हाना स्थानिक अधिकारी शांत असताना आता त्याच अधिकाऱ्यांनी छापेमारी सुरू केल्याने भेसळखोरांचे धाबे दणाणले आहेत.

शिर्डीत साईबाबांच्या दर्शनासाठी देश-विदेशातून येणाऱ्या लाखो भाविकांच्या श्रद्धेशी आणि आरोग्याशी थेट खेळ सुरू असल्याच्या तक्रारी समोर आल्यानंतर अन्न व औषध प्रशासन यंत्रणा खडबडून जागी झाली आहे. शिर्डी शहर व परिसरात प्रसाद म्हणून सर्रास विकल्या जाणाऱ्या पेढ्यांच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशासनाच्या विशेष पथकाने शिर्डीत दाखल होत नमुने संकलन मोहीम युद्धपातळीवर सुरू केली आहे. पेढ्यांच्या या कारवाईनंतर आता शिर्डीतील हॉटेल, रेस्टॉरंट आणि उपहारगृहांमध्ये वापरला जाणारा खवा, पनीर, दूध आणि तूप या दुग्धजन्य पदार्थांचीही सखोल तपासणी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एवढेच नव्हे तर, साईबाबा संस्थानच्या वतीने भाविकांना मिळणाऱ्या अधिकृत लाडू प्रसादासाठी वापरल्या जाणाऱ्या तुपाचा दर्जा देखील अन्न व औषध प्रशासनाने तपासून घ्यावा, अशी जोरदार चर्चा आता शिर्डीतील ग्रामस्थ आणि साईभक्तांमध्ये सुरू झाली आहे.



शिर्डीची जागतिक ओळख आणि प्रतिष्ठा जपण्यासाठी अन्नसुरक्षा नियमांचे काटेकोर पालन होणे अत्यंत गरजेचे आहे.

या कारवाईमुळे शिर्डीतील भेसळखोर आणि नियमबाह्य व्यवसाय करणाऱ्या प्रसाद विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत. शिर्डीतील अनेक दुकानांमध्ये विकल्या जाणाऱ्या पेढ्यांच्या बॉक्सवर उत्पादकाचे नाव, उत्पादनाची तारीख, बॅच नंबर तसेच मुदत समाप्तीची कोणतीही माहिती स्पष्टपणे नमूद केली जात नसल्याच्या तक्रारी भाविकांकडून सातत्याने येत होत्या. काही ठिकाणी तर पेढ्यांचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे समोर आले होते. या पार्श्वभूमीवर एफडीएच्या छापा पथकाने विविध दुकानांवर अचानक धाडी टाकून पेढ्यांचे नमूने गोळा केले आहेत. हे सर्व नमुने नियमानुसार सील करण्यात आले असून ते तातडीने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले जाणार आहेत. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषी आढळणाऱ्या विक्रेत्यांवर थेट गुन्हे दाखल करून कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी माहिती अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. भाविकांच्या आरोग्याचा विचार करून प्रशासनाने ही मोहीम केवळ पेढ्यांपुरती मर्यादित न ठेवता शहरातील संपूर्ण खाद्यपदार्थ विक्री केंद्रांची व्यापक तपासणी करावी, अशी मागणी आता साईनगरीत जोर धरू लागली आहे.


संपादकीय

## पुन्हा इंधन दरवाढीचा फटका?

अमेरिका आणि इराण यांच्यातील तणावामुळे संपूर्ण जगाला फटका बसला आहे. इंधन पुरवठा साखळी विस्कळित झाल्यामुळे भारतातही इंधनाच्या दरात वाढ झालेली आहे. अशातच आता पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींबाबत पुन्हा एकदा चर्चेला उधाण आले आहे. केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी असं एक विधान केले आहे, ज्यामुळे आता इंधनाच्या किमती पुन्हा वाढू शकतात का? असा प्रश्न सर्वसामान्यांच्या मनात निर्माण झाला आहे. मात्र सरकारकडून अद्याप कोणतीही थेट घोषणा करण्यात आलेली नसली तरी मंत्री यांच्या वक्तव्यातून भविष्यातील इंधन दर हे आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाच्या स्थितीवर अवलंबून असतील, असे संकेत मिळाले आहेत. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

जागतिक ऊर्जा बाजारावर सरकारची बारकाईने नजर केरळमधील त्रिशूरमध्ये पत्रकारांशी बोलताना सुरेश गोपी यांनी सांगितले की, 'केंद्र सरकार सध्या जागतिक ऊर्जा बाजारातील घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीच्या किमतींमध्ये कोणताही बदल करताना कच्च्या तेलाची उपलब्धता आणि त्याच्या पुरवठ्याची स्थिरता यांचा विचार केला जाईल.' इंधनाच्या किमती पुन्हा वाढू शकतात का, असा प्रश्न विचारल्यावर त्यांनी सांगितले की, 'सर्वप्रथम कच्च्या तेलाचा पुरवठा कसा राहतो हे पाहणे आवश्यक आहे. त्यानंतरच केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी आणि संबंधित मंत्रालय अंतिम निर्णय घेतील.'

मध्यपूर्वेतील तणावाचा परिणाम
गेल्या काही काळापासून मध्यपूर्वेतील भागातील वाढता तणाव आणि संघर्ष यामुळे जागतिक ऊर्जा बाजारावर परिणाम होत आहे. जगातील मोठ्या प्रमाणातील कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा या प्रदेशातून केला जातो. या भागातील कोणतीही भू-राजकीय अस्थिरता कच्च्या तेलाच्या किमती वाढवू शकते. त्याचा थेट परिणाम भारतासारख्या आयात-आधारित देशांवर होतो. भारत आपल्या गरजेपैकी सुमारे 85 टक्के कच्चे तेल परदेशातून आयात करतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या तर देशांतर्गत इंधनाचा खर्चही वाढतो. त्यामुळे आता आगमी काळात जर जागतिक बाजारात इंधनाच्या किंमती वाढल्या तर भारतातही पेट्रोल डिझेल महाग होऊ शकते




# पोलीस उपनिरीक्षक धनाजी ओमासे सेवानिवृत्त; कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडून गौरव

लोकनेता न्युज नेटवर्क
इंदापूर ता. प्रति:- राहुल जाधव

शेळगाव: कर्तव्यनिष्ठ सेवा आणि जनसेवेचा प्रदीर्घ वारसा जपणारे पोलीस उपनिरीक्षक धनाजी ओमासे यांचा सेवापूर्ती निमित्त भव्य सत्कार समारंभ आज सकाळी १० वाजता पार पडला. या सोहळ्याला महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय मामा भरणे यांनी विशेष उपस्थिती लावली.कार्यक्रमात बोलताना कृषिमंत्री भरणे यांनी ओमासे यांच्या समर्पित कारकिर्दीचा गौरव केला. "पोलीस



दलातील त्यांची कामगिरी अत्यंत कर्तव्यनिष्ठ आणि समाजाला न्याय देणारी राहिली आहे," अशा शब्दांत त्यांनी ओमासे यांचे कौतुक केले. तसेच त्यांच्या निवृत्तीनंतरच्या पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि आनंदाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. या भावूक आणि दिमाखदार सोहळ्याला स्थानिक नागरिक व पोलीस प्रशासनातील अधिकारी तसेच राजकीय नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भरधाव हायवाखाली चिरडून विद्यार्थिनीचा दुर्दैवी मृत्यू

लोकनेते न्यूज नेटवर्क
छ.संभाजीनगर | डॉ.ज्ञानदेव चेपटे

छत्रपती संभाजीनगर,दि.१४:छ.संभाजीनगर शहरातील उज्वल भवितव्याची स्वप्ने उराशी बाळगून शिक्षण घेत असलेल्या एका विद्यार्थिनीचा भीषण अपघातात दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना छत्रपती संभाजीनगर शहरात घडली आहे. या घटनेमुळे श्रीयश महाविद्यालयासह संपूर्ण विद्यार्थी वर्गावर शोककळा पसरली आहे. प्रतीक्षा


हायवा खाली चिरडून विध्यार्थीनीचा दुर्दैवी मृत्यू, छत्रपती संभाजीनगर हळहळले..!

बाळासाहेब सांगते असे मृत विद्यार्थिनीचे नाव असून ती श्रीयश महाविद्यालयात कॉम्प्युटर सायन्सच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत होती. पदवीचे शिक्षण पूर्ण करून करिअर घडवण्याची स्वप्ने पाहणाऱ्या प्रतीक्षाचा एका क्षणात काळाने घात केला. माहितीनुसार, प्रतीक्षा तिच्या दोन मैत्रिणींसह महाविद्यालयातील काम आटोपून एका स्कूटीवरून घरी निघाली होती. सातारा तांडा रोडमार्गे सातारा गावाकडे जात असताना एसआरपीएफ पेट्रोल पंपाजवळ स्कूटीवरील नियंत्रण सुटले आणि तिघीही रस्त्यावर कोसळल्या. याचवेळी मागून भरधाव वेगाने येणाऱ्या खडीने भरलेल्या हायवा ट्रकचे चाक प्रतीक्षाच्या डोक्यावरून गेल्याने तिचा जागीच मृत्यू झाला.या भीषण अपघातात तिच्यासोबत असलेल्या दोन्ही विद्यार्थिनी किरकोळ जखमी झाल्या. दरम्यान,या अपघाताप्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

---------------------

# कॉंग्रेसच्या नगराध्यक्षांसह नगरसेवक 'अंडरग्राउंड; शहराचा कारभार वाऱ्यावर

लोकनेते न्यूज नेटवर्क

---------

**शरद पवार पक्षाचे सरदार खॉ व उध्दव ठाकरे पक्षाचे कुणाल राठोड, विठ्ठल ठाकरे,जिशान मिर्झा हे शहरात उपस्थित.**

-------------------------

हिमायतनगर लक्ष्मण शेन्नेवाड
येथील नगरपंचायत हि कॉंग्रेसच्या ताब्यात असताना नगराध्यक्ष व नगरसेवक काही दिवसापासून 'अंडरग्राउड; असल्यामुळे सामान्य जनतेचा पाण्याचा प्रश्न, शहरातील स्वच्छतेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असताना राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे सरदार खॉ व शिवसेना




उध्दव ठाकरे पक्षाचे कुणाल राठोड, विठ्ठल ठाकरे, जिशान मिर्झा हे नगरसेवक सोडता इतर कुणीही शहरात नसल्याने शहराचा कारभार वाऱ्यावर सोडल्याचे दिसून येते आहे. विधानपरिषद प्राधिकारी मतदार संघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात वातावरण तापले असताना प्रत्येक पक्ष उमेदवार निवडून येण्यासाठी मोर्चे बांधणी करत असताना हिमायतनगर येथील नगरपंचायतीत एकहाती सत्ता मिळवलेल्या कॉंग्रेस पक्षाचे नगराध्यक्षांसह , नगरसेवक हे भाजपा उमेदवार अमरनाथ राजूरकर यांच्या पुरस्कृत सहलीवर गेल्यामुळे कॉंग्रेस नगराध्यक्ष व नगरसेवक भाजपाच्या गळास लागल्याची जोरदार चर्चा शहरात ऐकण्यास मिळत असल्यामुळे तालुक्यात नवीन चर्चेला उधाण आले असल्याचे दिसून येते आहे शहरात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे सरदार खॉ व उध्दव ठाकरे पक्षाचे कुणाल राठोड, विठ्ठल ठाकरे, जिशान मिर्झा हे उपस्थित असुन इतर भाजपा कॉंग्रेस पक्षाचे नगरसेवक व नगराध्यक्ष 'अंडरग्राउंड; असल्यामुळे शहराच्या विकास कामात अडथळा निर्माण होत आहे नागरिकांचा पाणी पुरवठाचा ,स्वच्छतेचा ,दिवाबत्ती,रस्त्याच्या अशा अनेक प्रश्नांना सामना करावा लागत असल्यामुळे जनतेत अंडरग्राऊंड झालेल्या नगराध्यक्ष व नगरसेवकांविषयी नाराजी व्यक्त होत आहे.---

------------------

# काल 14 जून रोजी जगभरात जागतिक रक्तदाता दिवस साजरा करण्यात आला.

लोकनेते न्यूज नेटवर्क
ऑस्ट्रेलियन शास्त्रज्ञ कार्ल लँडस्टेनर (१८६८) यांचा जन्मदिन.

या नोबल पुरस्कार विजेते जैवशास्त्रज्ञाने ABO रक्तगटांचा शोध लावला आणि रक्तदान या पवित्र संकल्पनेचा दिवा पेटवला .त्यांचा जन्म दिन जागतीक रक्तदाता दिन म्हणून साजरा केला जातो . या दिवसाची सुरुवात २००४ मध्ये जागतिक आरोग्य संघटना (WHO) आणि इतर आंतरराष्ट्रीय संस्थांनी केली. सुरक्षित आणि स्वेच्छेने रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे आणि रक्तदानाचे महत्त्व जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे हा या दिवसामागील मुख्य उद्देश आहे.
रक्तदान म्हणजे केवळ काही थेंब रक्त देणे नसुन एखाद्याला नवजीवन देण्याचा पवित्र संकल्प आहे.



आज जागतिक रक्तदाता दिनानिमित्त त्या सर्व रक्तदात्यांना मी मनःपूर्वक सलाम करतो जे कोणतीही अपेक्षा न ठेवता आपल्या रक्ताच्या प्रत्येक थेंबातून दुसऱ्यांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करतात. रक्ताचे एक युनिट तिन रूग्णांचे प्राण वाचवतात . आज भारतात दोन सेकंदाला रक्ताची गरज भासते.
कदाचित तुमच्या एका रक्तदानामुळे एखाद्या आईचे कुंकू टिकले असेल, एखाद्या वडिलांचा आधार वाचला असेल, एका बहिनी ने भावाच्या चेहऱ्यावरचे हास्य बघीतले असेल, एखाद्याची शस्त्रक्रिया पुर्ण झाली असेल,एखाद्या बालकाला वा त्याच्या आईला नवे आयुष्य मिळाले असेल किंवा एखाद्या रुग्णाच्या चेहऱ्यावर पुन्हा हसू फुलले असेल.
या रक्तदात्याचे हे निःस्वार्थ कार्य मानवतेचा सर्वोच्च आदर्श आहे. तुमच्या दानामुळे अनेक कुटुंबांना आनंद, आशा आणि जीवन मिळते.
आज रक्तदाता दिन सर्वत्र साजरा केला जात आहे पण फक्त साजरा करून उपयोग काय ? उपयोग तेव्हा होईल जेव्हा हा समाज या सर्व रक्तदात्यांकडून प्रेरणा घेईल व स्वतःला रक्तदानासाठी शारीरीक आणि मानसीक तयार करेल . तरच या दिवसाला खरे महत्व प्राप्त हाईल .
कार्ल लॅन्डस्टेनर ने लावलेला हा दिवा आपल्या सारख्या रक्तदात्यांमुळेच तेवत आहे . रक्तदात्यांना मानाचा मुजरा .सर्व रक्तदात्यांचे मनःपूर्वक आभार आणि जागतिक रक्तदाता दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

"जो करेल दान रक्त
तोच खरा ईश्वराचा भक्त ! "

**शब्दांकन ,**
**कुणाल साळुंके,**
**नियमित रक्तदाता**
**(Regular platelet Donner अफेरेसीस)**

# जनतेचा पोलीस म्हणून काम करा; आनंद कोकरे यांचा वंचित बहुजन आघाडी कडून सन्मान

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे स्मृतिचिन्ह देऊन गौरव.

दै. लोकनेता न्यूज नेटवर्क
बाळासाहेब खेडकर पाथर्डी | प्रतिनिधी

पाथर्डी पोलीस ठाण्याचे नवनियुक्त पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांचा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमास वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.
सत्काराला उत्तर देताना पोलीस निरीक्षक आनंद कोकरे म्हणाले की, "पोलीस हे जनतेसाठी आहेत. लोकांच्या सहभागातूनच प्रभावी पोलिसिंग घडते. सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळावा, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच गुन्हेगारी व अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल. जनतेचा विश्वास संपादन करून नागरिकाभिमुख काम करण्याला प्राधान्य दिले जाईल."
यावेळी वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष पप्पु बोर्डे यांनी सांगितले की, "वंचित, शोषित आणि सर्वसामान्य



नागरिकांच्या न्यायासाठी आमचा संघर्ष सुरू आहे. जनहिताच्या प्रश्नांवर पोलिस प्रशासनाशी सकारात्मक सहकार्य करून समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."
या प्रसंगी पप्पु बोर्डे, महेंद्र राजगुरू, शैलेन्द्र बोर्डे, एकनाथ ठोकळ नितीन पवार, आकाश शिंदे, श्रीधर बोर्डे, मीनाताई शिंदे, दत्तू सातपुते, सोपान भिंगारे, दिनकर गाडे, दिलीप सरसे, भीमराज शिंदे, अनिल बोडे, प्रकाश ठोंबे, योगेश बोर्डे, आबिद शेख, अमोल जाधव, विकास वाघमारे, सुरज क्षेत्रे, बाळासाहेब पंडागळे, अतुल कटारनवरे, लहू शिंदे, प्रदीप रंधवे यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.
कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देत पाथर्डी तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी जनतेच्या सहकार्याने कार्य करण्याचे आवाहन केले.

### वंचितांच्या न्यायासाठी संघर्ष सुरूच : पप्पु बोर्डे

वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रा. किसनराव चव्हाण सर यांच्या मार्गदर्शनाखाली "वंचित, शोषित आणि सर्वसामान्यांच्या न्यायासाठी वंचित बहुजन आघाडी सातत्याने संघर्ष करत आहे. जनहिताच्या प्रश्नांवर पोलिस प्रशासनाशी समन्वय ठेवून समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."

– पप्पु बोर्डे
तालुकाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी, पाथर्डी

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त दुर्मिळ वृक्ष लागवड व संवर्धन उपक्रम उत्साहात




*लोकनेता न्यूज नेटवर्क*
पालघर - श्री तुषार भोईर
वाडा - शिक्षक संचालित शिक्षण संस्था यांच्या डॉ. शांतीलाल धनजी देवशी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाडा येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभानिमित्त तसेच ५ जून जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून दुर्मिळ वृक्ष लागवड, जतन व संवर्धन उपक्रम उत्साहात राबविण्यात आला.
या प्रसंगी महाविद्यालयाचे नूतन प्राचार्य डॉ. रमाकांत बागुल यांचे पर्यावरण मंच व वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने दुर्मिळ वृक्ष भेट देऊन स्वागत करण्यात आले. विभागप्रमुख श्री. अनुप शंकर पानसरे व सहाय्यक प्राध्यापक डॉ. शिवप्रसाद दिलीप महाडकर यांनी या उपक्रमाचे आयोजन केले. त्यानंतर भेटस्वरूप देण्यात आलेल्या दुर्मिळ वृक्षांची महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्रीय उद्यानात लागवड करण्यात आली.
उपक्रमांतर्गत पंढरी कोरंटी (Barleria lawii T. Anderson), Flacourtia montana J. Graham आणि Sageraea laurina Dalzell या दुर्मिळ वनस्पतींची लागवड करण्यात आली. यापैकी Flacourtia montana या वनस्पतीची पिवळसर-लाल रंगाची फळे खाद्य असून ताप, अतिसार व शरीरातील जळजळ यांसारख्या विकारांवर तिचा पारंपरिक औषधी उपयोग केला जातो. तर Sager-aea laurina ही अत्यंत दुर्मिळ वनस्पती असून तिच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. तिची पाने संधिवाताच्या उपचारांमध्ये पारंपरिक पद्धतीने वापरली जातात.
कार्यक्रमादरम्यान प्राचार्य डॉ. रमाकांत बागुल यांनी पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे महत्त्व आणि दुर्मिळ वनस्पतींच्या संरक्षणाविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागप्रमुख श्री. अनुप शंकर पानसरे यांनी केले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या उपक्रमामुळे जैवविविधतेच्या संरक्षणाचा संदेश देण्यात आला. दुर्मिळ वनस्पतींचे संवर्धन ही काळाची गरज असून वनस्पतीशास्त्र विभागाने हाती घेतलेला हा उपक्रम पर्यावरण संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.
कार्यक्रमाच्या शेवटी सहाय्यक प्राध्यापक डॉ. शिवप्रसाद दिलीप महाडकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# सामाजिक कार्यकर्ते श्री. अमोल विठ्ठल पुलवळे यांच्या पुढाकारातून साकत येथे मोफत नेत्र तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



लोकनेता न्यूज नेटवर्क जामखेड : सुनिल पुलवळे

साहित्यरत्न प्रतिष्ठान, पाटोदा आणि पुण्यातील प्रसिद्ध बुधराणी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक कार्यकर्ते श्री. अमोल विठ्ठल पुलवळे यांच्या पुढाकारातून साकत येथे रविवारी (दि. १४ जून २०२६) मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. ग्रामपंचायत कार्यालयासमोर पार पडलेल्या या शिबिरास साकत व परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

शिबिराचे उद्घाटन ह.भ.प. उत्तम महाराज वराट यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी ग्रामीण भागात अशा आरोग्यविषयक उपक्रमांची नितांत गरज असल्याचे सांगत अमोल पुलवळे यांच्या सेवाभावी कार्याचे कौतुक केले.

शिबिराला माजी सभापती संजय वराट यांनी भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. तसेच माजी सभापती डॉ. भगवान मुरूमकर यांनीही या उपक्रमाचे कौतुक करत मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया ग्रामीण जनतेसाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे सांगितले.

या शिबिरात एकूण १९० नागरिकांची डोळ्यांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ६५ जणांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले, तर ३५ रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले. या सर्व रुग्णांवर पुणे येथे मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

तज्ज्ञ नेत्ररोगतज्ज्ञांच्या पथकाने नागरिकांची तपासणी करून डोळ्यांच्या आरोग्याबाबत आवश्यक मार्गदर्शन केले. आर्थिक अडचणींमुळे वेळेवर उपचार न घेणाऱ्या ग्रामीण नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यापूर्वी आयोजित करण्यात आलेल्या अशाच शिबिरात १७५ नागरिकांची तपासणी करण्यात आली होती. त्यावेळी ४० जणांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले होते, तर १० रुग्णांच्या मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडल्या होत्या. तसेच प्रवासाचा खर्चही आयोजकांकडून उचलण्यात आला होता.

सामाजिक कार्यकर्ते अमोल विठ्ठल पुलवळे हे शैक्षणिक साहित्य वाटप, आरोग्य शिबिरे, धार्मिक व सामाजिक उपक्रम तसेच वृक्षलागवड यांसारख्या विविध माध्यमांतून सातत्याने समाजसेवा करत असून त्यांच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

या शिबिरास माजी सभापती संजय वराट, सरपंच भाऊराव पाटील मुरूमकर, उपसरपंच राजभाऊ वराट, माजी सरपंच हरिभाऊ मुरूमकर, सदाशिव वराट, कैलास वराट, डॉ. भगवान मुरूमकर, विठ्ठल वराट, नागराज मुरूमकर, ॲड. संपतलाल पुलवळे, अजित वराट व सचिन वराट सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

# देगलूरमध्ये भेसळयुक्त पदार्थांच्या विक्री बाबत चिंता

*लोकनेता न्यूज नेटवर्क*
देगलूर प्रतिनिधी/ संतोष चिद्रावार लोणीकर

देगलूर तालुक्यात भेसळी युक्त खाद्यपदार्थ घोटका तसेच औषधांच्या विक्री बाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात असून संबंधित विभागाने व्यापक तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी होत आहे.
देगलूर तालुक्यातील प्रकारच्या खाद्यतेलांची गुटक्यांची तसेच औषधांची विक्री होत असताना त्यांच्या दर्जाबाबत शंका उपस्थित केला जात आहेत.

देगलूर शहर व तालुका हा महाराष्ट्र , कर्नाटक , तेलंगणा या तीन राज्याच्या सीमेवर वसलेले असल्यामुळे विविध वस्तूंची मोठ्या प्रमाणावर आवक जबाब होत असते. नागरिकांच्या म्हणण्यानुसार काही ठिकाणी भेसळयुक्त पदार्थांची विक्री होत आहे. संबंधित यंत्रणांनी याची सखोल चौकशी करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. देगलूर तालुका विविध प्रकारचे खरा व गुटखा खुल्या विक्रीस उपलब्ध आहे. अनेक अल्पवयीन मुले व युवक या व्यसनाच्या आहारी जात आहेत.
काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात खरा तयार करून त्याची विक्री होत असते. याबाबत अन्न व औषध प्रशासन तसेच पोलीस विभागाने संयुक्त कारवाई करावी अशी मागणी होत आहे. याशिवाय खाद्यतेलांच्या गुणवत्तेबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत.
काही व्यापारी भेसून येते तेलाची विक्री करीत असल्याची चर्चा असून अशा तेलांचा पुरवठा देगलूर शहरासह तालुक्यामध्ये व इतर भागांमध्येही होत असल्याचे सांगितले जाते. मात्र या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नाही. त्यामुळे संबंधित विभागाने नमुने तपासणी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी अशी मागणी होत आहे.

अलीकडेच अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी भेसळयुक्त पदार्थविरोधात कठोर भूमिका घेतल्याने जिल्ह्यातील संबंधित व्यावसायिका मध्ये खळबळ उडाली आहे. देगलूर तालुक्यातील काही औषध दुकानाबाबत ही प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. काही ठिकाणी परवानाधारक फार्मासिस्टच्या अनुपस्थितीत व्यवसाय सुरू आहेत. तसेच अनेक दुकानांमध्ये औषधी खरेदी केल्यानंतर ग्राहकांना नेहमीच दिले जात नासल्याच्या दिले जात नसल्याच्या तक्रारी ही समोर येत आहेत. याबाबत औषध प्रशासन विभागाने अचानक तपासणी मोहीम राबवून नियमाचे पालन होत आहे की नाही याची पडताळणी करावी, अशी मागणी होत आहे.

नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित विषय असल्याने अन्न व औषध प्रशासन , आरोग्य विभाग,
पोलीस प्रशासन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी समन्वय आणि कारवाई करून जोशीवर कठोर पावले उचलावीत अशी अपेक्षा नागरिकाकडून व्यक्त केली जात आहे.

# औसा तालुक्यात घरकुल योजनेमध्ये झालेल्या घोटाळ्याची चौकशी कधी..?
## ...संबंध तालुक्यातील ग्रामस्थांतून होतेय चौकशीची मागणी....पण घरकुल चौकशीला मुहूर्तच नाही???

लोकनेता न्यूज नेटवर्क
जीवन जाधव औसा
औसा तालुक्यातील अनेक गावोगावी घरकुल लाभ देण्यासाठी सर्वसामान्य कष्टकरी व मजुराकडून आर्थिक लूट झाली असल्याच बोललं जातंय तर अनेक गावात घरकुल मिळवून देतो असं सांगून हजारो रुपये घेऊन ही घरकुल लाभापासून अनेकांना वंचित ठेवत घरकुल मंजुरीसाठी गावातील गाव पुढाऱ्यांनी घेतलेले पैसे परत मागितले असता अरेरावी ची भाषा करण्यात येत आहे. तालुक्यातील अनेक गावोगावी कोणाचे एक हप्ते तर कोणाचे दोन हप्ते पडले असून राहिलेले बिल ही पडत नसल्याच्या अनेक तक्रारी ग्रामस्थ करत आहेत. अनेक गावोगावी घरकुल अर्धवट तर कुठे घरकुल न बांधताच बिले उचल्याची जोरदार चर्चा असतानाही प्रशासन याकडे दुर्लक्ष का करत आहे असाही प्रश्न सर्वसामान्यांना पडलेला आहे.
औसा तालुक्यातील अनेक गावागावात घरकुल योजनेमध्ये घोटाळा झाल्याची चर्चा असून अनेक गावात घरकुल अर्धवट तर कुठे घरकुल न बांधताच बिले उचल्याची दबक्या आवाजात चर्चा सुरु आहे.
औसा तालुक्यात घरकुल योजनेभोवती कथित गैरव्यवहाराचे सावट गडद झाले असून अनेक गावांत घरकुले अर्धवट अवस्थेत राहिल्याच्या, तर काही ठिकाणी प्रत्यक्ष बांधकाम सुरू होण्यापूर्वीच बिले उचलल्याच्या चर्चेला उधाण आले आहे.
या प्रकरणामुळे ग्रामीण भागातील गृहनिर्माण योजनेतील पारदर्शकता, देखरेख आणि निधीच्या वापरावर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.
औसा तालुक्यातील घरकुल योजनेच्या



माध्यमातून प्रत्येक गोरीगरिबांच्या डोक्यावर छत देण्याचे स्वप्न सरकारचा असून
या योजनेच्या माध्यमातून गरजू व गोरगरीब लोकांना घरकुल देण्यासाठी एकीकडे सरकार कठीबद्ध असताना मात्र गावातील लोकप्रतिनिधी कोण मात्र या योजनेसाठी गोरगरिबाची पिळवणूक करून एका घरकुलासाठी व घरकुल मंजूर करण्यासाठी दहा ते पंधरा हजार रुपयांचा दर ठरला असून. ठरलेल्या दराप्रमाणे गावपुढारी माध्यमातून प्रशासन दरबारी पैसे दिले की घरकुल मंजुरी होते व घरकुल मंजुरी झाल्यानंतर कुठलही बांधकाम न करता एक तर जुने घर दाखवून किंवा कुठलही बांधकाम न करता बिले उचलण्याचा प्रकार तालुक्यातील अनेक गावांमध्ये झाला आहे.औसा तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सुरू असलेल्या घरकुल कामांमध्ये अनियमितता झाल्याच्या अनेक तक्रारी पुढे आल्या असून गावकरी आणि स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांकडून चौकशीची मागणी होत आहे. अनेक ठिकाणी घरकुले केवळ अर्धवट उभारण्यात आली आहेत, तर काही ठिकाणी प्रत्यक्ष बांधकाम पूर्ण न होताही हप्त्यांची रक्कम काढण्यात आल्याची चर्चा आहे.
घरकुल योजना ही गरिबांना हक्काचे पक्के घर मिळवून देण्यासाठी राबवली जाणारी महत्त्वाची योजना आहे. त्यामुळे या योजनेत कोणताही गैरव्यवहार झाल्यास त्याचा थेट फटका लाभार्थ्यांना बसतो.
औसा तालुक्यातील घरकुल योजनेच्या कामाची उच्यस्तरीय चौकशीची गरज निर्माण झाली आहे. सध्या ग्रामीण भागातील चर्चेनुसार वं माहितीनुसार तक्रारी आणि चर्चांच्या पातळीवर हा मुद्धा जोर धरत आहे ; मात्र प्रशासकीय तपास, लेखापरीक्षण आणि लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष पडताळणीनंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकते.
ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा स्तरावरील यंत्रणांनी घरकुल लाभार्थ्यांची निवड, मंजुरी, बांधकामाची प्रगती आणि हप्त्यांचे वितरण यावर काटेकोर देखरेख ठेवणे अपेक्षित असते. तरीही काही ठिकाणी स्थानिक कर्मचाऱ्यांच्या संगनमताने निधीचा अपहार झाल्याची उदाहरणे समोर येत असल्याने योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी अधोरेखित होत आहेत.
या पार्श्वभूमीवर औसा तालुक्यातील घरकुल योजनेतील चर्चेतील कथित घोटाळ्याची सखोल चौकशी,वं घरकुल लाभार्थ्यांची प्रत्यक्ष घरकुल पाहणी आणि निधीवाटपाच्या सर्व नोंदींची तपासणी होणे आवश्यक असल्याचे स्थानिक वर्तुळातून सांगितले जात आहे. अशा चौकशीतूनच किती घरकुले अपूर्ण आहेत, कोणत्या टप्प्यावर अनियमितता झाली आणि जबाबदारी कुणाची आहे, हे स्पष्ट होईल.
घरकुल योजनेचा मूळ उद्देश गरिबांना सुरक्षित निवारा देण्याचा आहे; परंतु वारंवार समोर येणाऱ्या अनियमितता या उद्देशालाच धक्का देत आहेत. परिणामी ग्रामीण भागातील नागरिकांचा शासकीय योजनांवरील विश्वास डळमळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे... औसा पंचायत समितीतील अनागोंदी कारभार कारवाईकडे नागरिकांचे लक्ष.
घरकुल योजनेचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांनी घरकुल न बांधताच मोठ्या प्रमाणात पैसा उकळल्याची जोरदार चर्चा गावोगावी होत असून.

प्रशासनाच्या या मनमानी मुळे शासनाच्या पक्का घर योजनेला घरघर लावण्याचे काम काही कर्मचारी करत आहेत चक्क घरकुल न बांधता चिरीमिरी घेऊन अनेक गावात बोगस घरकुल बिले उचण्याचा प्रकार गावोगावी झाल्याची चर्चा आहे.
औसा तालुक्यात घरकुल योजना मंजूर झालेल्या लाभार्थ्यांची मोठी संख्या आहे यापैकी अनेकांनी घरकुल बांधले नाहीत तरी त्यांची सर्व बिले अदा करण्यात आली असल्याची चर्चा असून मोठ्या प्रमाणात शासकीय निधीचा गैरवापर झाला असल्याचे बोलले जात असून काही ठिकाणी तरी एकाच घरावर दोन तीन बिले काढल्याची चर्चा सुरू आहे..काही घरकुल विभागातील कर्मचारी ॲप वर कुठलेही फोटो अपलोड करून तसेच जिओ टॅगिंग मध्ये फोटो एक ठिकाणचा घर दुसऱ्याचे असे चित्र आहे.
औसा तालुक्यात अनेक ठिकाणी सरपंचांच्या नातेवाईकांचा ग्रामपंचायत कामामध्ये हस्तक्षेप वाढला असल्याने शासकीय योजनेचे तीनतेरा वाजले असून जे गाव पातळीवर काम करणारे कर्मचारी यांच्यावर दबाव टाकत आपणाला पाहिजे तसे काम करून घेत असल्याचे चित्र आहे.तरी तालुक्यातील गावोगावी राबविण्यात आलेली घरकुल योजनेची सखोल चौकशी व्हावी वं संबंधितावर कारवाई करण्याची मागणी केली जातेय...

# देगलूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे जमीन विक्री प्रकरण चर्चेत
## जमिनीचे बाजार मूल्य अधिक असूनही 32 गुंठे जमिनीची कमी दराने विक्री

दै.लोकनेता न्यूज नेटवर्क
देगलूर प्रतिनिधी/संतोष चिद्रावार लोणीकर

जमीन विक्रीला दिलेली तात्पुरती स्थिती कायम करावी किंवा नाही याचा निर्णय सहकार मंत्री ना. रावल सहा दिवसानंतर देणार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या 30 गुंठे जमिनीची बाजार मूल्य कैकपटीने अधिक असताना ही जमीन कमी दराने विक्री करून संस्थेचे सभापती आणि निवडक संचालकाचे यामध्ये हित साजरी जात आहे. असा आरोप आहे. या जमीन विक्रीस विरोध दर्शवून शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमीन विक्रीस पालन संचालकांनी दिलेली परवानगी रद्द करावी, यासाठी काही जणांनी राज्याचे सहकार मंत्री जयकुमार रावल यांच्याकडे धाव घेऊन याचिका दाखल केली.
सहकार मंत्र्यांनी जमीन विक्री तात्पुरती स्थिती दिली आहे. यावर दिनांक 9 जून रोजी मंत्रालयात पुन्हा सुनावणी झाली. जमीन विक्री कशी योग्य आहे? याबद्दल सभापती हसनाबादे यांनी वकिलामार्फत मंत्री महोदय समोर व्यक्तिवाद केला, तर कृषी उत्पन्न बाजार समितीची शेत जमीन विकणे कशी नियमबाह्य आहे.
? या विषयाचे सविस्तर विवेचन तक्रार करते तारकांत पाटील यांच्या वकिलांनी केले. दोन्ही बाजूचे मान्य ऐकल्यानंतर सहकार मंत्री ना. रावल यांनी सहा दिवसानंतर निर्णय देण्यात येईल, असे जाहीर केले. बाजार समितीत सेवा बजावून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना अजून पेन्शनची रक्कम आणि अन्य लाभ मिळाले नाहीत. काही कर्मचाऱ्यांनी संभाजीनगर हाय कोर्टात याचिका दाखल करून वरील लाभ मिळावेत अशी विनंती कोर्टाला केली होती. कोर्टाने कर्मचाऱ्यांची थकीत पेमेंट करावे, असे आदेश दिले. बाजार समितीने संबंधितांचे देणे देण्यासाठी आपल्या मालकीची शहरातील गट क्रमांक 831 मधील 32 गुंठे जमीन विक्रीला काढली असून इ- निविदेद्वारे विक्री प्रक्रिया राबविण्यात येत आहे. नांदेडचे एका समूहाने जमीन खरेदीचे निविदा भरली आहे. या प्रकरणाची भनक सभापती हसनावादी यांच्या विरोधकांना लागली. जमीन धोक्याच्या ठिकाणी असून जमिनीचे मूल्य अधिक आहे. असे एका निवेदनाद्वारे ताराकांत पाटील बालाजी पण कंट्रोल देगलूर येथील एका संचालकांनी नांदेडच्या जिल्हा उपनिबंधकांना अवगत केले आहे.

दरम्यानच्या काळात पणन संचालकांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जमीन विक्री प्रस्तावास मंजुरी दिली, त्यामुळे या प्रकरणाचा गुंता वाढला आहे ताराकांत पाटील यांनी राज्याचे सहकार मंत्री ना .
राहुल यांच्याकडे विकली विरोधात दावा दाखल केला. मंत्र्यांनी लगेच विक्री प्रकरणाला तात्पुरती स्थगिती दिली.

यावर आज दिनांक नऊ जून रोजी मंत्री महोदयासमोर पुन्हा सुनावणी झाली. विक्री प्रकरणाला कायम स्थगिती द्यावी, अशी सभापती यांच्या विरोधकांची म्हणणे असून विक्री प्रक्रिया पारदर्शकपणे सुरू असून दिलेली स्थिती उठवली अशी बाजार समितीची मागणी आहे. या प्रकरणात मंत्री कोणता निर्णय घेतात याकडे काही जणांचे लक्ष लागून आहे.

# वादळी वाऱ्याने स्वप्नांचा केला चुराडा
## "हाती आलेले केळी पीक उध्वस्त, तरुण शेतकऱ्याचा आक्रोश".

लोकनेता न्यूज नेटवर्क
परभणी/प्रतिनिधी :- रमेश मुलगीर
"एका रात्रीत होत्याचं नव्हतं झालं... वर्षभर जपलेलं स्वप्न डोळ्यादेखत मातीस मिळालं"
- वाघाळा येथील तरुण शेतकरी राजेश माणिकराव घुंबरे यांच्या डोळ्यातील अश्रू आणि कापऱ्या आवाजातून फुटले हे शब्द काळीज पिळवटून टाकणारे होते.
शुक्रवार, १२ जूनची रात्र केळी उत्पादक शेतकऱ्यांसाठी काळरात्र ठरली. रात्री साडे दहाच्या सुमारास सुटलेल्या प्रचंड वादळी वाऱ्याने आणि विजांच्या कडकडाटासह कोसळलेल्या पावसाने वाघाळा ता पाथरी.जि परभणी गावशिवारातील होतकरू शेतकरी राजेश घुंबरे यांच्या स्वप्नांचा अक्षरशः चुराडा केला. हातातोंडाशी आलेले केळीचे पीक काही क्षणांत भुईसपाट झाले आणि राजेश यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले.
वर्षभराची मेहनत, एका रात्रीत मातीमोल
केळी हे नगदी पीक. पण त्यासाठी लागणारी मेहनत, पाणी, खत आणि आर्थिक गुंतवणूक



अफाट. राजेश यांनीही वर्षभर रात्रंदिवस काबाडकष्ट करून केळीची बाग फुलवली होती. घडांनी लगडलेली झाडे पाहून डोळ्यांचे पारणे फिटत होते. यंदा बाजारात केळीला चांगला भाव असल्याने कर्ज फिटेल, मुलाबाळांच्या शिक्षणाची सोय होईल, घराचे छत बदलेल, अशी स्वप्ने राजेश यांनी रंगवली होती. मात्र, माल हातात येण्याच्या अगदी काही दिवस आधी निसर्गाने घाला घातला. अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे संपूर्ण केळीची बाग जमीनदोस्त झाली. फळांनी डवरलेली केळीची झाडे मुळासकट उन्मळून पडली. काही झाडांचे खोड मध्येच तुटले, तर तयार झालेले घड चिखलात मिसळले. हिरव्यागार बागेचे काही तासांत स्मशान झाले.
"हे फक्त आर्थिक नुकसान नाही, माझ्या स्वप्नांची राख झाली"
उध्वस्त झालेल्या बागेकडे पाहत राजेश ढसाढसा रडत म्हणाले, "वादळी वाऱ्यामुळे झालेले केळी पिकाचे नुकसान हे केवळ आर्थिक नुकसान नसून माझ्या वर्षभराच्या परिश्रमांचे आणि स्वप्नांचे नुकसान आहे. एका क्षणात सगळं संपलं. आता कर्ज कसं फेडायचं? मुलांच्या तोंडाला काय घास भरवायचा? हा प्रश्न मला खातोय." राजेश यांच्यासारख्या अनेक छोट्या शेतकऱ्यांसाठी केळी म्हणजे संपूर्ण वर्षाची भिस्त असते. बँकेचे कर्ज, सावकाराचे व्याज, खते-औषधांचे उधार, मजुरांची मजुरी - हे सगळं पीक हातात आल्यावर फेडायचं, या आशेवर शेतकरी जगत असतो. पण निसर्गाच्या एका फटक्याने सगळी गणितेच चुकतात.
शासनाने तातडीने मदतीचा हात द्यावा
वाघाळा परिसरात केवळ राजेशच नव्हे तर इतरही काही शेतकऱ्यांचे केळी, पपई व भाजीपाला पिकांचे नुकसान झाले आहे.
"शासनाने पंचनामे करून तात्काळ आर्थिक मदत जाहीर करावी. पीकविमा कंपन्यांनीही अडेलतट्टू भूमिका न घेता तातडीने नुकसान भरपाई द्यावी," अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांतून होत आहे.
एका रात्रीत होत्याचं नव्हतं झालेल्या राजेश घुंबरे यांच्या डोळ्यातील अश्रू पुसायला शासन धावून येईल का? हा प्रश्न अनुत्तरीत आहे.
सध्या तरी उध्वस्त बागेत उभा असलेला राजेश आभाळाकडे पाहत फक्त एकच प्रश्न विचारतोय - "माझं काय चुकलं?"

# *प्रशासकीय दिरंगाईवर जिल्हा परिषद सदस्य संतापले;
## सुनेत्रा पवारांसमोर मांडला अडचणींचा पाढा!*



लोकनेता न्यूज नेटवर्क
इंदापूर ता. प्रति:- राहुल जाधव
शेळगाव: राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्यांची एक महत्त्वाची बैठक जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांच्या 'शिवाई' बंगल्यावर पार पडली. या बैठकीत राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा वहिनी पवार यांनी सदस्यांशी थेट संवाद साधला.यावेळी उपस्थित सदस्यांनी प्रशासनाच्या संथ कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. तीन महिने उलटूनही अद्याप काहींच्या विकासकामांचा 'श्रीगणेशा' झालेला नाही, अशी खंत सदस्यांनी पवारांसमोर बोलून दाखवली. निर्णय प्रक्रियेत डावलले जात असल्याचे सांगत विकासकामांना गती देण्याची मागणी सदस्यांनी केली.या बैठकीत जिल्हा परिषद सदस्या सौ. सोनाली जाधव यांनीही त्या महत्त्वाच्या बैठकीत सक्रिय सहभाग नोंदवला. त्यांनी आपल्या मतदारसंघातील प्रलंबित कामे आणि स्थानिक अडचणी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासमोर मांडल्या. सदस्यांच्या या तक्रारींची नोंद घेत उपमुख्यमंत्री पवार यांनी यावर सकारात्मक मार्ग काढण्याचे आश्वासन दिले आहे.

# जागतिक विज्ञान क्षेत्रात होट्टल चालूक्य नगरीच्या सुपुत्राची मोठी झेप
## *डॉ. विजयकुमार जाधव यांचा जगातील अव्वल 5 टक्के शास्त्रज्ञांमध्ये समावेश*

लोकनेता न्यूज नेटवर्क
देगलूर प्रतिनिधी : वंकलवार प्रभू
होट्टल (ता. देगलूर) येथील सुपुत्र तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ संलग्न छत्रपती शिवाजी राजे महाविद्यालय, उदगीर येथील भौतिकशास्त्र व इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख प्रा. डॉ. विजयकुमार विनायकराव जाधव यांचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील सायरँक ग्लोबल (SciRank Global) क्रमवारीत जगातील अव्वल 5 टक्के शास्त्रज्ञांमध्ये समावेश झाला आहे. त्यांच्या या यशामुळे होट्टल गावासह देगलूर तालुका आणि मराठवाड्याचा गौरव वाढला आहे.
संशोधन लेख, सायटेशन्स, एच-



इंडेक्स, आंतरराष्ट्रीय संशोधन प्रभाव आणि वैज्ञानिक योगदान या निकषांच्या आधारे त्यांची निवड करण्यात आली. ऊर्जा साठवणूक (Energy Storage), सुपरकॅपेसिटर, लिथियम-आयन बॅटरी, 3D प्रिंटेड बॅटरी, गॅस सेन्सर आणि प्रगत पदार्थ विज्ञान या क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय संशोधन कार्य केले आहे.
ग्रामीण भागातून शिक्षण घेत जागतिक विज्ञानविश्वात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करणारे डॉ. जाधव हे अनेक तरुण संशोधकांसाठी प्रेरणास्थान ठरले आहेत. त्यांनी दक्षिण कोरिया, आयर्लंड, चीन, इस्रायल आणि युनायटेड किंग्डममधील नामांकित संशोधन संस्थांमध्ये संशोधन कार्य केले असून ऑक्सफर्ड विद्यापीठातही व्हिजिटिंग सायंटिस्ट म्हणून योगदान दिले आहे.
या यशाबद्दल बोलताना डॉ. जाधव यांनी सांगितले की, "ग्रामीण भागातूनही जागतिक दर्जाचे संशोधन करता येते हे सिद्ध झाले आहे. भविष्यात ऊर्जा साठवणूक व शाश्वत तंत्रज्ञान क्षेत्रात अधिक संशोधन करून विद्यापीठ व भारताचे नाव जागतिक स्तरावर उंचावण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे."
डॉ. विजयकुमार जाधव यांच्या या अभूतपूर्व यशाबद्दल विविध शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले असून होट्टल गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# मृतदेहाशी लग्न करणाऱ्या आंचलने हातच जोडले... म्हणाली, कृपया माझी बदनामी थांबवा...

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

काही महिन्यांपूर्वी नांदेडमधील एक प्रकरण खूप गाजलं होतं. आपल्या बॉयफ्रेंडच्या मृतदेहाशी लग्न केल्याने नांदेड येथील आंचल मामीडवार चर्चेत आली होती. तिने प्रियकर सक्षम ताटे या तरूणाच्या मृतदेहाशी लग्न केले होते. सक्षमच्या मृत्युनंतर आपण आजन्म सक्षम बनून त्याच्या घरी राहणार असल्याचे आंचल मामीडवार हिने जाहीरपणे सांगितले होते. मात्र आता या प्रेम कहाणीला वेगळं वळण लागलं आहे. आंचलने सक्षमच घर सोडण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे तिची बदनामी होत आहे, त्यामुळे आता तिने घर सोडण्याचं कारण सांगत बदनामी थांबवण्याची विनंती केली आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात. सक्षमचा खून

सक्षमच्या मृत्युनंतर आपण आजन्म सक्षम बनून त्याच्या घरी राहणार असल्याचे आंचल मामीडवार हिने जाहीरपणे सांगितले होते. पण आंचल सक्षमचे घर सोडून वडिलांच्या घरी निघून गेलीये. नोव्हेंबर 2025 मध्ये सक्षम ताटे या तरुणाचा खूण आंचलचे वडील, तिचा भाऊ आणि त्याच्या साथीदाराने गोळ्या झाडून केला होता. मयत सक्षम ताटे आणि आंचलचा भाऊ हे मित्र होते. आंचलच्या कुटुंबीयांकडून या प्रेम प्रकरणाला विरोध होता. तरीही दोघांचे प्रेमसंबंध सुरु असल्याने सक्षमची हत्या करण्यात आली होती.

आंचलने घर सोडलं...

सक्षमच्या हत्येच्या दुसऱ्या दिवशी अंतयात्रा निघण्यापूर्वी आंचल त्याच्या घरी पोहोचली आणि तिने टाहो फोडला.



सक्षमच्या मृतदेहाशी तीने लग्न केले होते. देशभरात ही बातमी त्यावेळी गाजली होती. सक्षम गेला तरी मी आजन्म सक्षम बनून त्याच्या घरीच राहणार असे माध्यमासमोर आंचल ने सांगितले होते. पण तीच आंचल सक्षमच्या घरून निघून सक्षमच्या आईला एकटं सोडून निघून गेल्याचा आरोप सक्षमच्या आईने केल्यानंतर आपण घर का सोडलं हे आंचलने स्पष्ट केलंय. माझी बदनामी थांबवा... आंचलने म्हटले की मी त्यांच्या घरी चांगल्या मनाने गेले होते. मी तिकडे राहत पण होते, पण सक्षमचा भाऊ माझ्याबरोबर नीट वागत नव्हता, त्याच माझ्याबद्दल बॅड इंटेंशन होत. हे मी त्याच्या घरच्यांना सांगितलं होत, ही गोष्ट पोलिसांना सुद्धा माहिती आहे. या गोष्टीमुळे मी सक्षमच घर सोडल आहे. त्याची आई आता माझी बदनामी करत आहे. कृपया माझी बदनामी थांबवा अशी विंनती आंचलने केली आहे.

## पूर्णा नदीपात्रातील अवैध वाळू माफियांवर महसूल प्रशासनाचा धडक प्रहार; ट्रॅक्टरसह वाळू जप्त!

लोकनेता न्युज नेटवर्क

जालना जिल्हा प्रतिनिधी
तालुक्यातील अवैध वाळू उपसा आणि गौण खनिजांच्या बेकायदेशीर वाहतुकीविरोधात भोकरदन व जाफ्राबाद महसूल प्रशासनाने संयुक्तपणे मोठी धडक कारवाई करत वाळू माफियांना जबर दणका दिला आहे. मौजे निमगांव येथील पूर्णा नदीपात्रातून अवैधरित्या वाळूची वाहतूक करणारे ट्रॅक्टर महसूल पथकाने रंगेहात जप्त केले.

रविवार, दिनांक 14 जून 2026 रोजी दुपारच्या सुमारास महसूल विभागाच्या विशेष पथकाने पूर्णा नदीपात्र परिसरात छापा टाकला. यावेळी अवैध वाळूची वाहतूक करणारे 'स्वराज' कंपनीचे पांढऱ्या-भगव्या रंगाचे विना क्रमांकाचे ट्रॅक्टर (चेसीस क्र. MBNBT53NCPCP59872)




आढळून आले. तपासणीदरम्यान ट्रॅक्टरमध्ये अंदाजे 1 ब्रास अवैध वाळू असल्याचे निष्पन्न झाले. सदर ट्रॅक्टर व वाळू राधाकृष्णा उत्तमराव सोनवणे (रा. निमगांव) यांच्याशी संबंधित असल्याचे महसूल प्रशासनाच्या तपासात समोर आले आहे.

ही कारवाई मा. सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भोकरदन श्री. बी. सरवनन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत मा. तहसीलदार भोकरदन श्री. ज्ञानेश्वर काकडे, मा. तहसीलदार जाफ्राबाद श्री. अविनाश लोंढे तसेच गौणखनिज पथक प्रमुख श्री. अविनाश पाटील (नायब तहसीलदार, महसूल-1) यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

महसूल पथकाने जप्त केलेले ट्रॅक्टर, वाळू व संबंधित मुद्देमाल कायदेशीर प्रक्रियेनंतर पोलीस स्टेशन भोकरदन येथे जमा केला असून पुढील दंडात्मक व कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे.

महसूल प्रशासनाने स्पष्ट इशारा देत सांगितले की, "तालुक्यात अवैध वाळू उपसा, गौण खनिजांची चोरी आणि बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही. अशा धडक कारवाया यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहतील."

## खोट्या बातम्यांमुळे बदनामी झाल्याचा आरोप; शेवगाव पोलीस ठाण्यात तक्रार

**लोकनेतान्युज नेटवर्क**

अहिल्यानगर | – सोशल मीडियासह वृत्तमाध्यमांमध्ये खोट्या आणि बदनामीकारक बातम्या प्रसारित करून राजकीय व सामाजिक प्रतिमा मलिन केल्याचा आरोप करत शेवगाव येथील अरुण भाऊसाहेब मुंढे यांनी शेवगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.तक्रारीनुसार, शेवगाव नगरपरिषदेमार्फत विद्युत कामांसाठी काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेशी आपला कोणताही संबंध नसताना काही व्यक्तींनी जाणूनबुजून खोटे आरोप केल्याचा दावा मुंढे यांनी केला आहे. तसेच निविदा प्रक्रियेवर दबाव आणण्यासाठी आपण फोन केल्याचा आरोपही पूर्णपणे निराधार असल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे.

मुंढे यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे की, संबंधित व्यक्तींनी सोशल मीडिया, व्हॉट्सअॅप, फेसबुक तसेच काही वृत्तमाध्यमांच्या माध्यमातून चुकीची माहिती प्रसारित केली. यामुळे समाजात आपली प्रतिमा मलिन झाली असून कार्यकर्ते, नातेवाईक आणि मित्रपरिवारामध्ये संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे.तक्रारीत राजेंद्र रामदास शिंदे त्यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे

## गुडसेला येथे पावसातही संवाद यात्रेला अभूतपूर्व प्रतिसाद;

**१७ जूनपासून पुणे–मुंबई पदयात्रेचे जोरदार आवाहन**



**दैनिक लोकनेता न्यूज़ नेटवर्क**

गुडसेला (जि. चंद्रपूर):
मुसळधार पावसाच्या झंझावातातही गुडसेला येथे आयोजित संवाद यात्रा अभूतपूर्व उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात यशस्वीरित्या पार पडली. प्रतिकूल हवामान असूनही समाजबांधवांचा मोठा जनसमुदाय उपस्थित राहिल्याने एकजुटीची आणि संघर्षाची ताकद स्पष्टपणे दिसून आली. कार्यक्रमात सचिन भाऊ साठे यांचे जोरदार जल्लोषात स्वागत करण्यात आले.

डॉ. आण्णाभाऊ साठे क्रांती सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. सचिन भाऊ साठे यांनी मार्गदर्शन करताना अनुसूचित जातीच्या आरक्षणातील उपवर्गीकरण तात्काळ लागू करण्याची ठाम आणि प्रभावी मागणी केली. समाजाच्या हक्कांसाठी आता निर्णायक लढ्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

१७ जून रोजी पुणे येथून सुरू होणारी आणि २४ जून रोजी मुंबईतील आझाद मैदान येथे पोहोचणारी आरक्षण उपवर्गीकरण पदयात्रा ही मातंग समाजाच्या न्यायहक्कांसाठी ऐतिहासिक टप्पा ठरणार असल्याचे त्यांनी ठासून सांगितले. या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होऊन संघर्ष अधिक तीव्र करण्याचे आवाहन करण्यात आले.

या संवाद यात्रेमुळे समाजात नवचैतन्य, जागरूकता आणि संघटनशक्तीची ताकद अधिक प्रभावीपणे निर्माण झाल्याचे दिसून आले.

यावेळी मिलिंद वाघमारे, राजूभाऊ येले, डॉ. कुलभूषण मोरे, लहुकांत काकडे, आशिषभाऊ नामवाड,दिगंबर आंबटवार, चंद्रकांत घोडके, अशोक मोरे, दयानेश्वर गायकवाड, इमांशू नामवाड, अरुण कांबळे, राम मेढे, योगेश वाघमारे, बालाजी मोरे, तिरुपती बाटवाडे, अंकुश मोरे, अरुण भोगे, आनंद हरगिले, आनंद पवार,श्रीकांत राजपंगे, मंगेश मोरे यांच्यासह अनेक गावकरी, पदाधिकारी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाचोड येथे 'एसजी जिम'चे भव्य उद्घाटन; युवकांना फिटनेसचा नवा पर्याय

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

पाचोड प्रतिनिधी | त्रिसिंग जायभाये
पाचोड, ता. १४ आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत आरोग्य जपण्यासाठी नियमित व्यायाम आणि शारीरिक तंदुरुस्तीचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. युवकांनी व्यसनमुक्त राहून निरोगी जीवनशैलीचा अवलंब करावा आणि फिटनेसकडे वळावे या उद्देशाने पाचोड (ता. पैठण) येथील युवा उद्योजक संकेत गायकवाड यांनी सुरू केलेल्या 'एसजी जिम' या अत्याधुनिक व्यायामशाळेचे उद्‌घाटन आज उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

या जिमचे उद्‌घाटन पैठणचे आमदार विलास बापू भुमरे यांच्या हस्ते करण्यात आले. उद्‌घाटन सोहळ्यास परिसरातील नागरिक, युवक आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रतिसाद दिला. यावेळी सरपंच शिवाजी भालसिंगे, एकनाथ फटांगडे, गायकवाड सर, पैठण येथील



नगरसेवक परदेशी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी संकेत गायकवाड यांचे अभिनंदन करत नव्या उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या आणि हा उपक्रम परिसरातील युवकांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

याप्रसंगी बोलताना मान्यवरांनी सांगितले की, सध्याच्या काळात युवकांमध्ये फिटनेसबाबत जागरूकता वाढत आहे. नियमित व्यायामामुळे शरीर सुदृढ राहण्यास मदत होते, तसेच मानसिक आरोग्यही चांगले राहते. ग्रामीण भागातील युवकांना दर्जेदार व्यायाम सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने 'एसजी जिम' हा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरणार आहे.

संकेत गायकवाड यांनी आपल्या मनोगतात जिम सुरू करण्यामागील उद्देश स्पष्ट करताना सांगितले की, परिसरातील युवकांना अत्याधुनिक व्यायाम सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि त्यांनी निरोगी जीवनशैलीचा अवलंब करावा, यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. युवकांनी व्यायामासोबतच शिस्त आणि आरोग्यदायी सवयी आत्मसात कराव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

उद्‌घाटन सोहळ्यादरम्यान जिममधील आधुनिक व्यायाम उपकरणांची पाहणी करण्यात आली. उपस्थितांनी या नव्या उपक्रमाचे स्वागत करत संकेत गायकवाड यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी पाचोड येथील अनेक कार्यकर्ते, युवक, नागरिक व फिटनेसप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोंभुर्णा तालुक्यात वीज संकट तीव्र; वारंवार खंडित वीज, स्मार्ट मीटर व वाढत्या बिलांमुळे नागरिक त्रस्त

**दैनिक लोकनेता न्यूज़ नेटवर्क**

पोंभुर्णा : पोंभुर्णा तालुक्यात मागील काही दिवसांपासून वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने नागरिक, शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी तसेच लघुउद्योजकांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत आहे. यासोबतच स्मार्ट मीटरमुळे वीज बिलात वाढ होत असल्याच्या तक्रारीही मोठ्या प्रमाणात समोर येत असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सध्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शेतीची महत्त्वाची कामे सुरू झाली आहेत. पेरणीपूर्व मशागत व सिंचनासाठी वीजेची आवश्यकता असताना वारंवार वीज खंडित होत असल्याने शेतकऱ्यांचे कामकाज विस्कळीत होत आहे. अनेक भागांमध्ये दिवसातून अनेक वेळा वीज ये-जा होत असल्याने शेती उत्पादनावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



घरगुती ग्राहकांनाही या समस्येचा मोठा फटका बसत आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासात अडथळे निर्माण होत असून लघुउद्योजक व व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच कमी दाबाचा वीजपुरवठा आणि अचानक होणारे खंड यामुळे इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे नुकसान होण्याची शक्यता वाढली आहे.

दरम्यान, स्मार्ट मीटरमुळे वीज बिलात अचानक वाढ झाल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. वापर न वाढताही बिल वाढत असल्याचा आरोप काही ग्राहकांकडून होत असून, स्मार्ट मीटरबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे महावितरण प्रशासनाने याबाबत तातडीने तपासणी करून पारदर्शकता ठेवावी, अशी मागणी होत आहे.

"पोंभुर्णा तालुक्यातील वीज पुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. नागरिक, शेतकरी व व्यापारी वर्ग त्रस्त आहे. स्मार्ट मीटरमुळे वीज बिलात वाढ झाल्याच्या तक्रारी वाढत आहेत. महावितरणने तातडीने वीज पुरवठा सुरळीत करावा व स्मार्ट मीटरबाबत स्पष्टता द्यावी. अन्यथा हजारो नागरिकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल."

**विलास मोगरकार**
**संचालक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक चंद्रपूर**

---

"स्मार्ट मीटर हे अचूक व पारदर्शक वीज मापनासाठी बसविण्यात येत आहे. वीजबिलाबाबत ग्राहकांच्या तक्रारी असल्यास त्यांची सखोल तपासणी केली जाईल. नागरिकांनी शंका असल्यास महावितरण कार्यालयाशी संपर्क साधावा."

**मंगेश येनूरकर**
**उपकार्यकारी अभियंता, महावितरण, पोंभुर्णा**

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)